प्रेसनोट

दिनांक १४/१२/२०१७

राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई या विभागाच्या मा. आयुक्त डॉ. आश्विनी जोशी, संचालक अंमलबजावणी व दक्षता श्री. सुनिल चव्हाण. विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क. पुणे विभाग. पुणे श्री. अर्जुन ओहोळ यांच्या निर्देशानुसार निरीक्षक, भरारी पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई व निरीक्षक, विभागीय भरारी पथक, पुणे यांच्या संयुक्त पथकाने आज दिनांक १४/१२/२०१७ रोजी मोई, चाकण, कुरुळी, निघोजे ता. खेड जि. पुणे या परिसरामध्ये वेगवेगळया ठिकाणी हातभटटी निर्मीती केंद्रावर तसेच देशी/विदेशी मद्य व बियर विक्री करणा–या धाब्यावर छापे टाकून अंदाजे ३०००० लिटर हातभटटी दारु तयार करण्यासाठी लागणारे रसायन, १८५० लिटर हातभटटी दारु तसेच अनाधिकृतपणे देशी/विदेशी मद्य व बियर विक्री करणा–या हॉटेल मल्हार गार्डन कुरुळी या ठिकाणांवरुन अंदाजे ११० बॉक्स जप्त करण्यात आले असून त्याची किंमत रु. ९,१९,३५०/– इतकी आहे. सदर कारवाईमध्ये हॉटेल मल्हार गार्डन या धाब्याचा चालक केतन राम जाचक वय २४ वर्षे रा. विठाई सदन जाचक वाडा दत्त मंदिर जवळ पिंपरी व चाकण पठारेवस्ती येथून गावठी दारुची निर्मीती करणारा पवनकुमार संजय मैनावत वय ३४ वर्षे रा. पठारेवस्ती चाकण यास ताब्यात घेण्यात आले.

सदर कारवाईमध्ये प्रसाद सास्तुरकर निरीक्षक, महाराष्ट्र राज्य भरारी पथक, मुंबई व नंदकुमार जाधव निरीक्षक, विभागीय भरारी पथक, पुणे यांच्या पथकाने केलेली असून सदर कारवाईत दु. निरीक्षक सर्वश्री जे.बी.होले, अनंत झाडे, राजेश सपकाळ, जवान सर्वश्री सदा जाधव, दिपक कळंबे, संजय केंद्रे, महादेव माने, अशोक पाटील, गणेश वाव्हळे, उषा दहिफळे, शरद हांडगर, संदिप मांडवेकर यांनी भाग घेतला.

